
दैनिक

# अतुल्य महाराष्ट्र

मुख्य कार्यालय : परळी वैजनाथ

बीड महाराष्ट्र | गुरुवार, 2 एप्रिल 2026 | अंक क्र. 313 | वर्षे 3 रे | मुल्य 3 रुपये | पृष्ठे 4

Website : atulymaharashtra.com RNI RGN No. MAH/MAR 2023/52446 Email : dailyatulyamaharashtra@gmail.com








# गोपीनाथ मुंडे यांचा विचार आणि वारसा पुढे घेवून जाणारे आम्ही आहोत : ना. राम शिंदे

## ना. राम शिंदे यांची आ. कराड यांच्या संवाद कार्यालयास सदिच्छा भेट

■ **लातूर प्रतिनिधी**

महाराष्ट्र विधान परिषदेचे सभापती ना. राम शिंदे आणि राज्यसभेचे नवनिर्वाचित सदस्य खा. रामराव वडकुते यांनी लातूर ग्रामीणचे आमदार श्री रमेशआप्पा कराड यांच्या संवाद संपर्क कार्यालयास सदिच्छा भेट दिली असता त्यांचा आ. कराड यांनी यथोचित सत्कार करून स्वागत केले.

लातूर येथील एका कार्यक्रमासाठी महाराष्ट्र विधान परिषदेचे सभापती ना. राम शिंदे, राज्यसभेचे नवनिर्वाचित सदस्य खा. रामराव वडकुते आणि माजी आमदार रमेश शेंडगे हे आले असता त्यांनी लातूर ग्रामीणचे आमदार श्री रमेशआप्पा कराड यांच्या लातूर येथील अंबाजोगाई रोडवर असलेल्या संवाद या संपर्क कार्यालयास सदिच्छा भेट दिली यावेळी दोन्ही मान्यवरांचा आ. कराड यांनी यथोचित सत्कार करून स्वागत केले. ना. राम शिंदे आणि आ. रमेशअप्पा कराड यांच्यात विविध विषयावर चर्चा झाली.

सत्करप्रसंगी उपस्थितांशी संवाद साधताना ना. राम शिंदे म्हणाले की, रमेशआप्पा आणि मी अनेक वर्षापासून चांगले मित्र आहेत, लोकनेते गोपीनाथरावजी मुंडे साहेबांचा विचार आणि वारसा पुढे घेऊन जाणारे आहोत. ज्यावेळी मी विधानसभेत होतो त्यावेळी रमेशआप्पा विधान परिषदेचे सदस्य होते तर आता मी विधानपरिषदेत आहे तर आप्पा विधानसभेत आहेत अवघ्या ६२२ मतांमुळे मी विधानसभेत जाऊ शकलो नाही मात्र येत्या काळात निश्चितपणे सुधारणा करू असे त्यांनी बोलून दाखविले. याप्रसंगी भाजपा किसान मोर्चाचे प्रदेश उपाध्यक्ष विक्रमकाका शिंदे, जिपचे माजी अध्यक्ष राहूल केंद्रे, लातूर मनपाचे विरोधीपक्ष नेते देविदास काळे, जिप सदस्य महादेव साळुंखे, पद्माकर चिंचोलकर, महेंद्र गोडभरले, पंस उपसभापती शरद दरेकर, अनिल भिसे, दशरथ सरवदे, वैभव सापसोड, उद्धव काळे, सुकेश भंडारे, सतीश आंबेकर, विजय काळे, विष्णू गोरे, वसंत करमुडे, मनोज कराड, राजकिरण साठे, हनुमंत गव्हाणे, सुधाकर काळे, गोपाळ पडिले, आदिनाथ मुळे, विजय चव्हाण, रमाकांत फुलारी, चंद्रकांत कातळे, भागवत गीते, अच्युत कातळे, सुरेखा पुरी, अंजली काळे, हेमांगी येळे, ललिता कांबळे, सिद्धेश्वर मामडगे, रवींद्र पाटील, लक्ष्मण गव्हाणे, संजय सावंत, माणिक आलुरे, संजय विरुळे, राजेंद्र काळे, आत्माराम जाधव, उत्तम चव्हाण, अहमद शेख, देवराव मोहिते, संतोष चव्हाण, लहूराजे सव्वाशे, रमेश खाडप, व्यंकट रसाळ, नारायण राठोड, विठ्ठल कस्पटे, मारुती शिंदे, लक्ष्मण खलंग्रे, विठ्ठल डोंगरे, गणेश डुबते, राम पटणे, नानासाहेब कसपटे यांच्यासह भाजपाचे लोकप्रतिनिधी पक्ष पदाधिकारी कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# महाराष्ट्र राज्यातील डिजिटल मिडिया परिषदेच्या सर्व जिल्ह्यांनी सहभागी व्हावे : प्रदेशाध्यक्ष अनिल वाघमारे

■ **मुंबई /प्रतिनिधी**

अखिल भारतीय मराठी पत्रकार परिषदेचे उदगीर जिल्हा लातूर येथे 44 वे राष्ट्रीय अधिवेशन परिषदेचे मुख्य विश्वस्त श्री.एस.एम.देशमुख सर यांच्या अध्यक्षतेखाली होत आहे.या 44 व्या राष्ट्रीय अधिवेशनात डिजिटल मिडिया परिषदेच्या महाराष्ट्र राज्यातील सर्व जिल्ह्यांनी सहभागी व्हावे असे आवाहन प्रदेशाध्यक्ष अनिल वाघमारे यांनी केले आहे.



याबाबत अधिक वृत्त असे की, अखिल भारतीय मराठी पत्रकार परिषदेचे राष्ट्रीय अधिवेशन मुख्य विश्वस्त श्री एस.एम. देशमुख सर यांच्या अध्यक्षतेखाली दर दोन वर्षांनी महाराष्ट्र राज्यातील विविध जिल्ह्यात होत असते. या वर्षीचे 44 वे राष्ट्रीय अधिवेशन हे लातुर जिल्ह्यातील उदगीर या ठिकाणी दिनांक 18 आणि 19 एप्रिल 2026 रोज होत आहे. या 44 व्या राष्ट्रीय अधिवेशनाचे उद्घाटन लोकमत माध्यम समुहाचे मुख्य संपादक श्री.राजेंद्रबाबु दर्डा यांच्या हस्ते होणार आहे. महाराष्ट्र राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस हे या अधिवेशनाचे मुख्य आकर्षण असणार आहेत.

त्याच बरोबर उबाठाचे नेते खासदार संजय राऊत यांची थेट मुलाखत होणार आहे. महाराष्ट्राचे मुख्यमंत्री आणि इतर मान्यवर मंत्री, खासदार,आमदार, सेलिब्रिटी त्याच बरोबर या राष्ट्रीय अधिवेशनाचे स्वागताध्यक्ष राज्याचे बांधकाम राज्यमंत्री तथा लातूर जिल्ह्याचे पालकमंत्री ना.श्रीमंत. छत्रपती शिवेंद्रसिंहराजे भोसले,माजी मंत्री आ.संजय बनसोडे हे असणार आहेत. आपण आपल्या जिल्ह्यातील डिजिटल मिडीया परिषदेचे जिल्हाध्यक्ष या नात्याने सर्वांना या राष्ट्रीय अधिवेशनाची माहीती द्यावी. व अखिल भारतीय मराठी पत्रकार परिषदेचे मुख्य विश्वस्त श्री. एस.एम सर यांच्या अध्यक्षतेखाली होत असलेल्या परिषदेच्या 44 व्या राष्ट्रीय अधिवेशनात येत्या 18 आणि 19 एप्रिल रोजी उदगीर येथे सहभागी व्हावे.

अशा सुचना देऊन महाराष्ट्र राज्यातील डिजिटल मिडिया परिषदेच्या सर्व जिल्ह्यांनी सहभागी होण्यासाठी जिल्हाध्यक्षांनी तयारी करावी असे आवाहन डिजिटल मिडिया परिषदेचे प्रदेशाध्यक्ष अनिल वाघमारे यांनी केले आहे.

# नवी दिल्लीत मराठा क्रांती मोर्चा आणि केंद्रीय मंत्र्यांची सदिच्छा भेट; पवनपुत्र हनुमान मूर्तीने गौरव

■ **नवी दिल्ली : वृत्तसंस्था**

देशाच्या राजधानीत आज एक महत्त्वपूर्ण आणि लक्षवेधी घडामोड घडली. केंद्रीय जलशक्ती मंत्री सी आर पाटील यांची मराठा क्रांती मोर्चाचे राज्य समन्वयक महेश दादा डोंगरे यांनी सदिच्छा भेट घेतली. या भेटीदरम्यान विविध सामाजिक व संघटनात्मक विषयांवर चर्चा झाल्याची माहिती समोर येत आहे. विशेष म्हणजे, मराठा समाजातून येऊनही गुजरातसारख्या राज्यात स्वतःचे भक्कम राजकीय व सामाजिक वर्चस्व निर्माण करणाऱ्या कर्तृत्ववान नेतृत्वाबद्दल डोंगरे यांनी गौरवोद्गार काढले.



यावेळी महेश दादा डोंगरे यांच्या हस्ते केंद्रीय मंत्री सी. आर. पाटील यांचा पवनपुत्र हनुमानाच्या मूर्तीने सन्मान करण्यात आला. मराठा क्रांती मोर्चाच्या वतीने ही भेट समाजाच्या विविध प्रश्नांवर सकारात्मक संवादाची ठरल्याचे मानले जात आहे.

# कार्यकर्त्यांना अधिक सक्षम आणि अद्यावत करण्याचा भाजपाचा प्रशिक्षणातून प्रयत्न

## भाजपाच्या प्रशिक्षण शिबिर उद्घाटन प्रसंगी युवा नेते ऋषिकेश कराड

■ **लातूर प्रतिनिधी**

भारतीय जनता पार्टी ही कार्यकर्त्यांची पार्टी असून कार्यकर्ता हाच पक्षाचा खरा बलस्थान आहे सक्षम कार्यकर्ता घडला तरच पार्टी सक्षम घडणार आहे याच उद्देशाने सुरू करण्यात आलेल्या पंडित दीनदयाल उपाध्याय प्रशिक्षण शिबिरातून कार्यकर्त्यांना अधिक सक्षम आणि अद्यावत करण्याचा भाजपाचा प्रयत्न असल्याचे प्रतिपादन भारतीय जनता युवा मोर्चाचे जिल्हाध्यक्ष युवा नेते ऋषिकेशदादा रमेशआप्पा कराड यांनी केले.

लातूर तालुक्यातील भाजपाच्या मुरुड मंडलातील कार्यकर्त्यांसाठी आयोजित करण्यात आलेल्या पंडित दीनदयाल उपाध्याय निवासी प्रशिक्षण वर्गाचे उद्घाटन युवा नेते ऋषिकेशदादा कराड यांच्या हस्ते नांदगाव येथील कौशल्या सिल्क येथे झाले. त्यावेळी ते बोलत होते उद्घाटन प्रसंगी व्यासपीठावर मार्गदर्शक तुकाराम गोरे, मंडलाध्यक्ष सुरज शिंदे, प्रताप पाटील आणि भाजयुमो मंडलाध्यक्ष किरण मुंडे यांची व्यासपीठावर उपस्थिती होती. या निवासी प्रशिक्षण शिबिरास मुरुड मंडळातील 108 भाजपाचे लोकप्रतिनिधी पदाधिकारी बूथ प्रमुख शक्ती केंद्रप्रमुख सहभागी झाले होते.




सेवाभाव वृत्तीतून काम करणारे भाजपाचे कार्यकर्ते अधिक सक्षम व्हावे, त्यांच्यात जनसेवेची आणि देशभक्तीची भावना अधिक निर्माण व्हावी यासाठी भाजपाच्या वतीने सर्वत्र प्रशिक्षण शिबिराचे आयोजन केले जात असल्याचे सांगून ऋषिकेशदादा कराड यांनी भाजपाच्या नेतृत्वातील शासनाच्या माध्यमातून विविध कल्याणकारी योजनामुळे जनतेच्या जीवनमानात मोठी सुधारणा होत असल्याचे सांगून भाजपाच्या प्रत्येक कार्यकर्त्यांनी देशाचे यशस्वी पंतप्रधान नरेंद्रजी मोदी आणि राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्रजी फडणवीस यांच्या विविध कल्याणकारी योजना गोरगरीब सर्वसामान्य गरजू पर्यंत पोहोचण्याचे काम करावे असे आव्हान केले.

प्रारंभी मंडल अध्यक्ष सुरज शिंदे यांनी प्रास्ताविकातून प्रशिक्षण शिबिराच्या आयोजनामाची भूमिका विशद केली सूत्रसंचालन दिलीप पाटील यांनी केले. या प्रशिक्षण वर्गात वैचारिक अधिष्ठान, भाजपाचा इतिहास, कार्यपद्धती, भाजपा सरकारची कामगिरी आणि अमलबजावणी, सोशल मीडिया या विषयावर विविध क्षेत्रात तुकाराम गोरे, रोहिदास वाघमारे, महेश कणसे, दिलीप पाटील, प्रशांत साखरे यांच्यासह इतर अनेकांनी अत्यंत प्रभावी मनोगत व्यक्त केले.

# महेश साखर कारखान्यातील कोट्यवधींची मशिनरी चोरीला माजी आ.भीमराव धोंडे यांचा मोठा गौप्यस्फोट : संशयितांची नावे निष्पन्न,लवकरच गुन्हे दाखल होणार

■ **आष्टी प्रतिनिधी**

आष्टी तालुक्याची 'कामधेनू' असा लौकिक असलेला आणि अनेक वर्षे बंद अवस्थेत असलेला कडा सहकारी साखर कारखाना पुन्हा एकदा सुरू करण्यासाठी सध्या युद्धपातळीवर प्रयत्न सुरू आहेत. मात्र,शेतकऱ्यांच्या या आशादायी चित्राला गालबोट लावणारी एक अत्यंत धक्कादायक घटना आता समोर आली आहे. कारखान्याच्या उभारणीचे काम अंतिम टप्प्यात असतानाच, आवारातून तब्बल कोट्यवधी रुपयांच्या मशिनरीची चोरी झाली आहे.या प्रकरणातील संशयितांची नावे निष्पन्न झाली असून, लवकरच याप्रकरणी पोलिसांत रीतसर गुन्हे दाखल केले जातील असा मोठा गौप्यस्फोट माजी आ.भीमराव धोंडे यांनी केला आहे. आष्टी येथील भगवान महाविद्यालयात बुधवारी दि.१ एप्रिल आयोजित करण्यात आलेल्या पत्रकार परिषदेत ते बोलत होते.यावेळी अशोक साळवे उपस्थित होते.

माजी आ.धोंडे यांनी महेश कारखान्याच्या उभारणीचा, आतापर्यंत आलेल्या संकटांचा आणि सद्यस्थितीचा सविस्तर आढावा पत्रकारांसमोर दिला. अडचणींचा डोंगर पार करत कारखाना अंतिम टप्प्यात माजी आ. धोंडे यांनी माहिती देताना सांगितले की,आष्टी आणि परिसरातील ऊस उत्पादक शेतकऱ्यांच्या हितासाठी व स्थानिक अर्थव्यवस्थेला नवसंजीवनी देण्यासाठी महेश सहकारी साखर कारखाना कोणत्याही परिस्थितीत सुरू करण्याचा आम्ही निर्णय घेतला. या संपूर्ण प्रवासात अनेक मोठी आर्थिक, प्रशासकीय आणि तांत्रिक संकटे उभी राहिली.परंतु, या सर्व अडथळ्यांवर यशस्वीपणे मात करून आता कारखान्याचे काम अंतिम टप्प्यात आले आहे. येत्या गाळप हंगामात कारखान्याचे धुराडे पेटलेले दिसेल, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला.या प्रकल्पामुळे केवळ शेतकऱ्यांनाच नव्हे, तर वाहतूकदार, पूरक उद्योग (Ancillary) आणि स्थानिक तरुणांना मोठ्या प्रमाणावर रोजगाराच्या संधी उपलब्ध होणार आहेत. हा प्रकल्प तालुक्याच्या अर्थचक्राला मोठी गती देईल, असेही ते म्हणाले.

**कोट्यवधींच्या चोरीने खळबळ; सुरक्षेवर मोठे प्रश्नचिन्ह :** कारखान्याचे काम अत्यंत वेगात आणि सकारात्मक वातावरणात सुरू असतानाच अज्ञात चोरट्यांनी कारखान्याच्या महागड्या मशिनरीवर डल्ला मारल्याची गंभीर बाब माजी आ. धोंडे यांनी उघड केली. ही चोरी काही हजारांची नसून थेट कोट्यवधी रुपयांच्या घरात आहे.विशेष म्हणजे, या चोरीतील संशयितांची नावे आता समोर आली आहेत.

त्यांच्यावर लवकरच पोलिसांत कठोर कारवाईसाठी अधिकृत तक्रार दाखल केली जाणार आहे. या मोठ्या चोरीमुळे कारखान्याच्या उभारणीच्या गतीवर थोडाफार परिणाम होण्याची शक्यता असली,तरी नियोजित वेळेतच प्रकल्प पूर्ण करण्यासाठी प्रशासन आणि सर्व संबंधित यंत्रणा शर्थीचे प्रयत्न करत असल्याचे माजी आ. धोंडे यांनी स्पष्ट केले.




### चोरी झाली तरी 'कारखाना सुरू होणारच' : माजी आ.धोंडे यांचा निर्धार

महेश सहकारी साखर कारखाना ही या भागातील शेतकऱ्यांची जीवनवाहिनी आहे. हे स्वप्न सत्यात उतरवण्यासाठी आम्ही आतापर्यंत अनेक संकटे झेलली आहेत. आता या चोरीच्या प्रकाराने आम्ही अजिबात खचणार नाही.आमचा निर्धार पक्का असून, कोणत्याही परिस्थितीत येणाऱ्या हंगामात गाळप सुरू करून शेतकऱ्यांच्या अपेक्षा आम्ही पूर्ण करूच असा विश्वास माजी आ. भीमराव धोंडे यांनी व्यक्त केला आहे.



# मराठी भाषेसाठी राजू बाविस्कर यांना साहित्य अकादमीचा पुरस्कार प्रदान

■ **नवी दिल्ली वृत्तसंस्था**

साहित्य अकादमीतर्फे २०२५ या वर्षासाठी जाहीर करण्यात आलेल्या साहित्य पुरस्कारांचे आज येथे वितरण करण्यात आले. मराठी भाषेसाठी जळगाव येथील प्रसिद्ध चित्रकार व लेखक राजू बाविस्कर यांना हा पुरस्कार प्रदान करण्यात आला. मानचिन्ह, शाल आणि एक लाख रुपये रोख असे या पुरस्काराचे स्वरूप आहे.

देशातील मान्यताप्राप्त २४ भाषांमधील उत्कृष्ट साहित्यकृतींना यंदाचे साहित्य अकादमी पुरस्कार जाहीर झाले होते. त्यात मराठी भाषेसाठी जळगाव येथील प्रसिद्ध चित्रकार व लेखक राजू बाविस्कर यांच्या 'काळ्यानिळ्या रेषा' या आत्मकथेसाठी लेखक राजू बाविस्कर यांना हा सन्मान जाहीर झाला होता. नवी दिल्लीतील कमानी ऑडिटोरियममध्ये झालेल्या या विशेष समारंभात साहित्य अकादमीचे अध्यक्ष माधव कौशिक यांच्या हस्ते श्री. बाविस्कर यांना सन्मानित करण्यात आले. यावेळी प्रसिद्ध हिंदी साहित्यिक आणि साहित्य अकादमीचे माजी अध्यक्ष विश्वनाथप्रसाद तिवारी, अकादमीच्या उपाध्यक्षा श्रीमती कुमुद शर्मा, संस्कृती मंत्रालयाचे संचालक अनीश राजन, अकादमीच्या सचिव श्रीमती पल्लवी होळकर यांची प्रमुख उपस्थिती होती.

साहित्यिकांना पुरस्कार देऊन सन्मानित करणे हे समाजाचे दायित्व असल्याचे सांगून श्री. विश्वनाथ प्रसाद तिवारी म्हणाले, की समाजातील या सृजनशील सकारात्मकतेचा गौरव झाला नाही तर समाज मूल्यहीन होऊन नष्ट होईल . त्यामुळे या सृजनाचा गौरव करणे ही अमूर्त स्वरूपातील समाजाचे प्रतिनिधी असलेल्या साहित्य अकादमीसारख्या संस्थांची जबाबदारी आहे. त्यासोबतच तो समाजाचा धर्म म्हणजेच कर्तव्यही आहे. साहित्यिकांच्या साहित्यातून समाजाला प्रेरक मुल्ये मिळत असतात. लेखक हा सदैव जागरूक असतो. त्याचे जीवन वैशिष्ट्यपूर्ण असते कारण तो एकाच जगण्यामरण्यात अनेक जगणे-मरणे अनुभवत असतो. असे सांगून त्यांनी पारतंत्र्याच्या कालखंडात प्रख्यात साहित्यिक भारतेंदू हरिश्चंद्र यांच्या साहित्याने एक युग निर्माण केले. त्यातून पुढे आलेल्या स्वदेशी आणि स्वभाषा या दोन्ही मूल्यांची पुढे चळवळ झाली, याचा दाखला दिला. अकादमीचे अध्यक्ष माधव कौशिक यांनी पुरस्कारांमागची भूमिका विषद केली . सचिव श्रीमती होळकर यांनी प्रास्ताविक केले तर श्रीमती कुमुद शर्मा यांनी आभार मानले.

यंदाच्या पुरस्कारांमध्ये काव्यसंग्रह, कादंबरी, कथासंग्रह, निबंध, समीक्षा, आत्मकथा अशा विविध साहित्य प्रकारांतील विविध पुस्तकांची निवड करण्यात आली आहे. देशातील विविध भाषांमधील साहित्यिक परंपरेचे प्रतिनिधित्व करणाऱ्या या साहित्यकृतींना तज्ज्ञांच्या समितीद्वारे निवडण्यात आले आहे.

### इतर भाषेतील साहित्य अकादमी पुरस्कार विजेते याप्रमाणे : ( भाषा व लेखक)

- **आसामी- देवब्रत दास**
- **बांगला -प्रसून बंद्योपाध्याय**
- **बोडो – सहायसुली ब्रह्म**
- **डोगरी – खजूर सिंह ठाकुर**
- **इंग्रजी – नवतेज सरना**
- **गुजराती – योगेश वैद्य**
- **हिंदी -ममता कालिया**
- **कन्नड – अमरेश नुगडोगी**
- **कश्मीरी – अली शैदा**
- **कोकणी – एच एम. पेरनाळ**
- **मैथिली – महेन्द्र झा**
- **मलयाळम् – एन. प्रभाकरन**
- **मणिपुरी – हाउबम नलिनी देवी**
- **नेपाली -प्रकाश भट्टराई**
- **ओडिया – गिरिजाकुमार बलियारसिंह**
- **पंजाबी – हरजिंदर पाल 'जिंदर '**
- **राजस्थानी – जितेंद्र कुमार सोनी**
- **संस्कृत – महामहोपाध्याय साधु भद्रेशदास**
- **संताली – सुमित्रा सोरेन ( मरणोत्तर )**
- **सिंधी – भगवान अटलानी**
- **तमिळ – एस. तमिळसेलवन**







# हट्टे, भिंगोले, श्रीमती पेडगावकर, व महानंदा वाळके यांना सेवानिवृत्ती निमित्ताने निरोप समारंभ

## प्रभारी उपमुख्य अभियंता हिम्मतराव अवचार यांच्या हस्ते सपत्नीक सत्कार

■ **परळी /प्रतिनिधी**

औष्णिक विद्युत केंद्र परळी येथील कोळसा हाताळी विभागातील उप कार्यकारी अभियंता धनंजय सुधाकर हट्टे, सहा.अभियंता दिलीप तात्याराव भिंगोले, सहा.लेखापाल श्रीमती भक्ती भगवान पेडगावकर, व कामगार श्रीमती महानंदा श्रावण वाळके यांना दि.३० मार्च २०२६ रोजी सायं ५ वा. प्रशासकीय कार्यालयातील सभागृहात सेवानिवृत्तीनिमित्त सत्कार व निरोप समारंभ कार्यक्रमात निरोप देण्यात आला. या सेवानिवृत्त अधिकारी कर्मचारी यांना प्रभारी उपमुख्य अभियंता हिम्मतराव अवचार यांच्या हस्ते सपत्नीक सत्कार करण्यात आला.

या प्रसंगी अधीक्षक अभियंता राजू रेड्डी, अधीक्षक अभियंता एस एन बुकतारे,अधीक्षक अभियंता धनंजय कोकाटे, वरिष्ठ व्यवस्थापक अरविंद येरणे, सुरेश गर्जे, आरोळे,गणेश बांगर, वैजनाथ आबा कराड ,श्रीकांत ,कार्यकारी रसायनतंत्रज्ञ सतीश मुंडे, अभियंता मानव संसाधन विभागाचे महादेव वंजारे ,जाधव आदींची उपस्थिती होते या प्रसंगी मित्र सहकारी ,कुटुंबातील सदस्य उपस्थित होते. कार्यक्रमाच्या सुरुवातीस सेवानिवृत्ती अधिकाऱ्याची चित्रफीत दाखवण्यात आली. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन राजू गजले यांनी केले. तर उपस्थितांचे आभार सहायक कल्याण अधिकारी शरद राठोड यांनी मानले.



# आर.के.बी.एड.,डी.एड.लॉ कॉलेजच्या आर.के.युवा 'ज्ञानप्रवाहाचे' प्रकाशन

मुंबई (पंकजकुमार पाटील ):-भांडुप येथील सिद्धिविनायक शिक्षण प्रसारक मंडळाच्या आर.के.बी.एड व डी.एड, विधि महाविद्यालय, यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ अभ्यास केंद्र यांचे संयुक्त वार्षिक स्नेहसंमेलन व कला क्रीडा महोत्सवाचा बक्षीस समारंभ विभागीय संचालक श्री वामन नाखले, ठाणे महानगरपालिका उपायुक्त महादेवराव जगताप, मनपा कर्मचारी बँकेचे संचालक व मुंबई विद्यापीठ सिनेट सदस्य श्री प्रदीप सावंत, सिनेट सदस्य शशिकांत झोरे, श्री मयूर पांचाळ, जेजेटीयू विद्यापीठाचे श्री नायकोडी, डॉ.बाबासाहेब आंबेडकर विधी महाविद्यालयाचे मा.प्राचार्य श्री गायकवाड, संस्थेचे संचालक रमेश खानविलकर आदी मान्यवरांच्या उपस्थित पार पडला.

संचालक रिद्धेश खानविलकर यांच्या संकल्पनेतून विद्यार्थ्यांचे लेख असलेले विधी महाविद्यालयाचे " R. K. JURI'S JOURNAL" व शिक्षणशास्त्राचे "ज्ञानप्रवाह" वार्षिक अंकाचे प्रकाशन मान्यवरांच्या हस्ते पार पडले.

विभागीय संचालक श्री वामन नाखले यांनी विद्यार्थ्यांनी सादर केलेल्या सांस्कृतिक कार्यक्रमाचे कौतुक केले. श्री महादेव जगताप उपायुक्त व संचालक यांनी तरुणांनी स्पर्धा परीक्षेत सहभागी होऊन केंद्रीय लोकसेवा आयोग, महाराष्ट्र राज्य लोकसेवा आयोग यांच्या परीक्षा देऊन प्रशासनात येणे आवश्यक असून रिद्धेश खानविलकर सारखे तरुण या महाराष्ट्रात तयार होणे आवश्यक आहे असे म्हणाले.

मुंबई विद्यापीठाचे सिनेट सदस्य प्रदीप सावंत , सिनेट सदस्य शशिकांत झोरे, सिनेट सदस्य मयूर पांचाळ यांनी प्रशस्त इमारत, भव्य वाचनालय, विद्यार्थ्यांना देण्यात आलेल्या सुविधा, प्राध्यापक वर्ग,व रिद्धेश खानविलकर यांचे नियोजन त्यामुळे संस्था अधिक प्रगती पथावर भविष्यात जावो अशी इच्छा व्यक्त केली.

## करंजखेड ग्रामीण कार्यकारी सहकारी संस्थेची शंभर टक्के वसुली

■ **महागांव :**

महागाव तालुक्यातील मोजा करंजखेड येथील ग्रामीण कार्यकारी सहकारी विविध संस्थेने आर्थिक शिस्तीचे उत्तम उदाहरण घालत खरीप पीक कर्जाची शंभर टक्के वसुली साध्य केली आहे.

सन २०२५/२०२६ या वर्षात संस्थेकडून खरीप पीक कर्ज उचल करणाऱ्या एकूण ११८ सभासदांनी त्यांनी घेतलेले ९१ लाख ९ हजार ३०० रुपये इतके संपूर्ण कर्ज दिनांक ३१ मार्च २०२६ पर्यंत वेळेत परतफेड केले आहे. त्यामुळे संस्थेची १०० टक्के कर्ज वसुली पूर्ण झाली असून परिसरात या यशाचे कौतुक होत आहे. सभासदांनी दाखवलेल्या प्रामाणिकपणा आणि जबाबदारीमुळे संस्थेची आर्थिक विश्वासार्हता अधिक बळकट झाली असल्याचे मत व्यक्त केले जात आहे.या उल्लेखनीय कार्याबद्दल संस्थेचे अध्यक्ष अविनाश श्रीरामजी भांगे, उपाध्यक्ष गजानन सुभाष ठाकरे, सचिव माधवराव वानखडे तसेच सर्व संचालक मंडळ यांच्या वतीने कर्जाची परतफेड करणाऱ्या सर्व सभासदांचे मनःपूर्वक आभार व्यक्त करण्यात आले आहेत. तसेच भविष्यातही सभासदांकडून असेच सहकार्य मिळेल, अशी अपेक्षा व्यक्त करण्यात आली आहे.

# बुलढाण्यात ४ एप्रिल रोजी 'कुरेश कॉन्फरन्स'चे चौथे राष्ट्रीय अधिवेशन

## समाजबांधवांना उपस्थित राहण्याचे आवाहन

■ **परळी वैजनाथ (प्रतिनि-धी):**

कुरेश बिरादरीच्या सामाजिक, शैक्षणिक, आर्थिक आणि व्यापारी प्रश्नांवर मंथन करण्यासाठी कुरेश कॉन्फरन्स (Regd.) च्या वतीने चौथ्या राष्ट्रीय अधिवेशनाचे आयोजन करण्यात आले आहे. हे अधिवेशन दिनांक ४ एप्रिल २०२६ रोजी सकाळी १० ते सायंकाळी ६ वाजेपर्यंत राष्ट्रवादी भवन, मलकापूर रोड, बुलढाणा येथे संपन्न होणार आहे.

या अधिवेशनाबाबत माहिती देताना कुरेश कॉन्फरन्सचे बी ड जिल्हाध्यक्ष तथा परळीचे नग रसेवक कादर पाशा कुरेशी यां नी समाजातील सर्व स्तरांतील बांधवांना मोठ्या संख्येने उपस्थित राह ण्याचे आवाहन केले आहे. अधि वे शनामध्ये समाजाच्या स र्वांगीण प्रगतीसाठी विविध विषयांवर सखोल चर्चा करण्यात येणार आहे:

विविध क्षेत्रांतील प्रश्नांवर मंथन: समाजासमोरील सामाजिक, शैक्षणिक आणि विशेषतः व्यापार क्षेत्रातील समस्यांवर गांभीर्याने चर्चा करून ठोस निर्णय घेतले जातील.

कुरेश बिरादरीचा रा जकारणातील सहभाग आणि भ विष्यातील प्रतिनिधित्व वाढवण्याबाबत धोरणात्मक चर्चा होणार आहे. या अधिवेशनाचे मुख्य आकर्षण म्हणजे महाराष्ट्रातील विविध शहरांतून नुकतेच निवडून आलेल्या कुरेशी समाजातील नगरसेवकांचा भव्य नागरी सत्कार केला जाणार आहे.



**■ हे अधिवेशन कुरेश समाजाच्या भविष्यासाठी दिशादर्शक ठरणार आहे. समाजाच्या सशक्तीकरणासाठी आणि आपल्या हक्कांच्या चर्चेसाठी राज्यातील सर्व पदाधिकारी, प्रतिनिधी आणि कार्यकर्त्यांनी बुलढाणा येथे मोठ्या संख्येने उपस्थित राहावे.**

**■ — कादर पाशा कुरेशी**

**■ (जिल्हाध्यक्ष, कुरेश कॉन्फरन्स, बीड)**

या महत्वपूर्ण सोहळ्यासाठी राज्यभरातून समाजबांधव मोठ्या संख्येने येण्याची शक्यता असून, तयारी जोमाने सुरू आहे.

दैनिक पत्रक प्रकाशक मालक संपादक श्री. नितीन सोपानराव ढाकणे मुद्रक विठ्ठल त्रिंबक साबळे मातोश्री ऑफसेट प्रिंटर्स, मोंढा, हैद्राबाद बँकेजवळ परळी वैजनाथ, जि. बीड पिन - 431515 येथे छापुन मुख्य कार्यालय दैनिक अतुल्य महाराष्ट्र, जलालपुर रोड परळी वै. ता. परळी वै.जि.बीड (महाराष्ट्र) पिन - 431515 येथे प्रकाशित केले आहे. संपादक नितीन सोपानराव ढाकणे, मो. 8446447777 (वाद : परळी न्यायलय अंतर्गत)

# मुरघास बॅगच्या क्षमतेत तफावत; आष्टी तालुक्यातील दूध उत्पादक शेतकऱ्यांची मोठी आर्थिक फसवणूक

संतोष सानप | आष्टी

दि. 30 :- मराठवाड्यातील दूध उत्पादनाचे केंद्र म्हणून ओळखल्या जाणाऱ्या आष्टी तालुक्यात दुग्धव्यवसायाला मोठी गती मिळाली आहे. तालुक्यात दररोज लाखो लिटर दुधाचे उत्पादन होत असून, हे दूध सरकारी संघांसह राज्यातील विविध खासगी प्रकल्पांना पुरवले जाते. दुग्धव्यवसायाचा कणा असलेल्या दुभत्या जनावरांच्या चाऱ्याचा प्रश्न सोडवण्यासाठी येथील शेतकरी आता मोठ्या प्रमाणावर मका पिकापासून `मुरघास` बनवण्यावर भर देत आहेत. मात्र, हा मुरघास साठवण्यासाठी वापरल्या जाणाऱ्या प्लास्टिक बॅगच्या साठवणूक क्षमतेवरून सध्या शेतकऱ्यांची मोठी फसवणूक होत असल्याचे समोर आले आहे.

जनावरांना बाराही महिने हिरवा चारा उपलब्ध व्हावा यासाठी शेतकरी मका पिकाचा मुरघास करून ठेवतात. अनेक शेतकऱ्यांकडे स्वतःचे मनुष्यबळ उपलब्ध नसल्याने ते मजुरांकडून प्रति टन १,००० रुपये मजुरी देऊन मुरघास बनवून घेतात. हा मुरघास साठवण्यासाठी बाजारात १ टन, ३ टन आणि ५ टन अशा विविध क्षमतेच्या प्लास्टिक बॅग उपलब्ध आहेत. मात्र, विक्रेत्यांकडून सांगण्यात येणारी बॅगची क्षमता आणि प्रत्यक्ष त्यात बसणारा मुरघास यामध्ये मोठी तफावत आढळत आहे. शेतकऱ्यांनी दिलेल्या माहितीनुसार, ५ टन क्षमता असल्याचे सांगून विकल्या जाणाऱ्या बॅगमध्ये प्रत्यक्षात साडेतीन ते चार टन इतकाच मुरघास मावतो. अशाच प्रकारे १ टन किंवा ३ टनाच्या बॅगमध्येही वजनापेक्षा कमी साठवणूक होते. यामुळे शेतकऱ्यांची दुहेरी फसवणूक होत आहे. एकीकडे बॅग खरेदी करताना ५ टनाचे पैसे मोजले जातात, तर दुसरीकडे मजुरांना प्रति टन मजुरी देताना बॅगच्या सांगितलेल्या क्षमतेनुसार पैसे द्यावे लागतात. प्रत्यक्ष चारा कमी मावत असल्याने शेतकऱ्यांना नाहक आर्थिक भुर्दंड सहन करावा लागत आहे. बाजारात मुरघास साठवणुकीसाठी वेगवेगळ्या आकाराच्या बॅग मिळतात. मात्र, या बॅगचा आकार आणि त्यातील चाऱ्याची घनता यांचा ताळमेळ बसत नसल्याने वजनात घट येते. त्यामुळे दूध उत्पादक शेतकऱ्यांनी मुरघास बॅग खरेदी करताना केवळ विक्रेत्याच्या शब्दावर विश्वास न ठेवता, बॅगची गुणवत्ता आणि प्रत्यक्ष साठवणूक क्षमतेची खात्री करूनच खरेदी करावी, असे आवाहन सुज्ञ शेतकऱ्यांकडून केले जात आहे. अन्यथा, कष्टाने कमवलेला पैसा अशा फसव्या साठवणूक साधनांमुळे वाया जाण्याची भीती निर्माण झाली आहे.

### असा असतो बॅगचा आकार

**मुरघास साठवण्यासाठी वापरल्या जाणाऱ्या गोल बॅग्सचा आकार हा प्रामुख्याने त्यांच्या व्यासावर आणि उंचीवर अवलंबून असतो; साधारणपणे १ टन क्षमतेच्या बॅगचा व्यास ५ फूट आणि उंची ५ ते ६ फूट असते, ३ टन क्षमतेच्या बॅगसाठी व्यास ८ फूट आणि उंची साधारण ७ ते ८ फूट लागते, तर ५ टन क्षमतेच्या मोठ्या बॅगचा व्यास १० फूट आणि उंची साधारण ८ ते १० फूट इतकी असते. ही मापे चाऱ्याच्या प्रकारावर आणि तो किती घट्ट दाबून भरला आहे यावर थोडी कमी-जास्त होऊ शकतात, परंतु सरासरी याच आकारमानाचा वापर केला जातो.**





### बंकर शेतकऱ्याच्या फायद्याचे

**साधारणपणे हिरव्या चाऱ्याची कुट्टी केली असता, १ घनफूट जागेत १५ ते १८ किलो कुट्टी बसते. ५ टन (५००० किलो) क्षमतेसाठी तुम्हाला साधारणपणे ३०० ते ३३० घनफूट जागेची आवश्यकता असते. त्यामुळे मोठ्या उत्पादक दूध शेतकऱ्यांनी मुरघास करण्यासाठी बंकर तयार केले तर हे कायमस्वरूपी उपयोगात आणता येतील. प्लास्टिक बॅगला वारंवार खर्च करण्यापेक्षा बंकर ला एकदम खर्च करून शेतकऱ्यांना आर्थिक बचत करणे शक्य आहे.**

## सिरसाळा व्यापारी असोसिएशनचे अध्यक्ष जलाल भाई तांबोळी यांची हज, उमरा यात्रा संपन्न; सिरसाळ्यात जंगी स्वागत



सिरसाळा/अतुल बडे

येथील व्यापारी असोसिएशनचे अध्यक्ष जलाल भाई तांबोळी यांनी आपली ४० दिवसांची पवित्र हज यात्रा यशस्वीरीत्या पूर्ण करून मायदेशी आगमन केले. या निमित्ताने सिरसाळा ग्रामस्थांच्या वतीने आणि व्यापारी असोसिएशनच्या वतीने त्यांचा जंगी सत्कार व सन्मान करण्यात आला. अतिशय भक्तिमय वातावरणात पार पडलेल्या या सोहळ्यात जलाल भाई तांबोळी यांनी आपल्या प्रवासातील अनुभव कथन केले. यावेळी उपस्थित मान्यवरांच्या हस्ते त्यांचा शाल, श्रीफळ आणि पुष्पहार देऊन यथोचित गौरव करण्यात आला.या सत्कार सोहळ्याला प्रशासकीय अधिकारी आणि राजकीय-सामाजिक क्षेत्रातील मान्यवरांची लक्षणीय उपस्थिती होती, ज्यात प्रामुख्याने सिरसाळा पोलिस ठाण्याचे सहाय्यक पोलीस निरीक्षक गोरखनाथ दहिफळे, पंढरी (दादा) काळे, ग्रामपंचायत सदस्य प्रशांत देशमुख, माजी ग्रा.प. सदस्य देवराव हनुमंत काळे,अँड सतीश भाऊ काळे, दराडे, सोनार असोसिएशनचे व्यापारी रामनाथ शहाणे, पोकॉ.समुद्रे सिरसाळा व्यापारी असोसिएशनचे उपाध्यक्ष रामलिंग लासे, सचिव चाँदसाब पिंजारी. तसेच रफिक पत्रकार आणि ग्रामस्थ उपस्थित होते. जलाल भाई तांबोळी यांचा सत्कारसर्वधर्मीय बांधवांनी एकत्र येत केलेल्या या सत्कारामुळे सिरसाळा गावातील सामाजिक सलोखा आणि एकतेचे दर्शन घडले.यावेळी जलाल भाई यांनी शुभेच्छांबद्दल सर्वांचे आभार मानले आणि ही पवित्र यात्रा आपल्या आयुष्यातील अविस्मरणीय ठेवा असल्याचे सांगितले.

## 14 वर्षे मोफत ज्ञानदानाचे कार्य करणारे प्रा.अजित इथापे यांचा गौरव



आष्टी प्रतिनिधी:

आष्टी तालुक्यातील धानोरा येथील जनता उच्च माध्यमिक विद्यालयात इयत्ता अकरावी, बारावीच्या विद्यार्थ्यांना जीवशास्त्र विषयाचे ज्ञानदानाचे पवित्र कार्य करणारे प्रा. अजित इथापे यांनी 19 वर्षाच्या सेवेमध्ये 14 वर्षे मोफत म्हणजे एकही रुपया पगार न घेता स्वतःच्या खर्चाने ज्ञानदानाचे पवित्र कार्य केले. त्यानंतर 20 टक्के,40 टक्के व 60 टक्के असे टप्पा अनुदानावर पगारी सेवा पाच वर्ष पूर्ण केली.

शासनाच्या चुकीच्या धोरणाचा त्रास राज्यातील अनेक शिक्षिकांना व शिक्षकांना भोगावा लागतोय. 2001 नंतर राज्यात नवीन शाळांना परवानगी देताना "कायम विना अनुदान" तत्त्वावर परवानगी देण्याचा निर्णय शासनाने घेतला होता. अनुदानाची मागणी करणार नाही असे हमीपत्र लिहून घेऊनच सदर शाळांना परवानगी देण्यात आली होती. परंतु शासनाच्या या निर्णयाविरोधात तालुका,जिल्हा स्तरापासून मंत्रालयापर्यंत अनेक प्रकारचे सुमारे 150 आंदोलने करून सतत पाठपुरावा करत राज्यातील शिक्षकांना संघटित केल्याने उच्च माध्यमिक शाळा व कनिष्ठ महाविद्यालयचा "कायम" शब्द काढून शासनास अनुदान देण्यास भाग पाडले. बीन पगाराची नोकरी काय असते? हलाखीचे जीवन हे त्यांनी जवळून पाहिल्याने स्वतःला शिक्षक संघटनेत झोकून देऊन शिक्षकांना पगार सुरू होईपर्यंत सतत आंदोलने,पाठपुरावा केला. त्याचा लाभ आज अनेक शिक्षक घेत आहेत.शिक्षण क्षेत्रातील उल्लेखनीय कार्याबद्दल त्यांना नुकताच "राज्यस्तरीय आदर्श पुरस्कार" मिळाला आहे.

19 वर्षाचा यशस्वी कार्यकाळ पूर्ण केल्याबद्दल जनता उच्च माध्यमिक विद्यालयाचे उपप्राचार्य सोपानराव तिपोले सर व सर्व शिक्षक,शिक्षिकां, शिक्षकेतर कर्मचाऱ्यांनी त्यांचा गौरव केला.

# सिरसाळा पोलिसांची अवैध वाळू वाहतुकीवर कारवाई; ७ लाखांचा मुद्देमाल जप्त!







सिरसाळा/अतुल बडे

बीड जिल्ह्यामध्ये अवैध वाळू उपसा आणि वाहतुकीविरोधात पोलिसांनी कंबर कसली असून, सिरसाळा पोलीस ठाण्याच्या हद्दीत अवैध वाळू वाहतूक करणारा एक ट्रक पकडण्यात आला आहे. या कारवाईत ट्रकसह अंदाजे ७ लाख २० हजार ६६४ रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला असून एका आरोपीवर गुन्हा दाखल करण्यात आला आहे. मिळालेल्या माहितीनुसार, सोमवार दिनांक ३० मार्च २०२६ रोजी सकाळी ११:३० वाजेच्या सुमारास, कृषीकुल समोरून सिरसाळाकडे येणाऱ्या रोडवर पोलिसांनी सापळा रचला होता. यावेळी संशयास्पद वाटणारा एक टाटा कंपनीचा पांढऱ्या रंगाचा ट्रक (क्र. MH 47 Y 0228) थांबवून त्याची झडती घेतली असता, त्यामध्ये (किंमत ७,००,००० रुपये). ३ ब्रास वाळू (प्रति ब्रास ६,८८८ रुपये प्रमाणे, एकूण २१,६६४ रुपये) असा एकुण ७,२१,६६४ रुपयचा मुद्दे माल जप्त करण्यात आला आहे.

विनापरवाना अवैध रित्या वाळूची वाहतूक केली जात असल्याचे स्पष्ट झाले.या प्रकरणी पोलीस अंमलदार विश्वजीत विश्वंबर देवकते (वय ३६, नेमणूक शिरसाळा पोलीस स्टेशन) यांनी दिलेल्या तक्रारीवरून, शेख समीर शेख रशीद (रा. बरकत नगर, परभणी) याच्यावर

भारतीय न्याय संहिता (BNS) कलम ३०३ (२) सह कलम ४, २१ आणि खनिज (विकास व विनीयमन) अधिनियम १९५७ नुसार गुन्हा नोंदवण्यात आला आहे.सदर ची कारवाई सहाय्यक पोलीस निरीक्षक गोरखनाथ दहीफळे यांच्या मार्गदर्शनाखाली पोहे.कॉ सुशांत सोनवणे, अशीश शेंगुळे,यांनी केली.असुन पुढील तपास पोलीस अंमलदार तौर करत आहे. जिल्ह्यातील अवैध वाळू माफियांवर या कारवाईमुळे मोठा वचक बसण्याची शक्यता निर्माण झाली आहे.

## लोकजागर

### लोकसेवार्थ : निराधार महिलांसाठी 'शक्ती सदन'चा आधार

महाराष्ट्र कल्याणकारी राज्य म्हणून ओळखले जाते. महिला सक्षमीकरण, सबलीकरणात आपले राज्य देशात अव्वल आहे. महिलांना शैक्षणिक, सामाजिक, औद्योगिक, आर्थिकदृष्ट्या सक्षम करण्यासाठी महाराष्ट्रात शासनाने नेहमीच पुढाकार घेतला आहे. महिला सक्षमीकरणाचा समृद्ध वारसा आपल्या राज्याला आहे. हा वारसा राज्य शासन पुढे नेत असून महिला व बालविकास विभागाच्या माध्यमातून विविध योजना राबवित आहे, त्यापैकी एक म्हणजे 'शक्ती सदन योजना' आहे. या योजनेमुळे निराधार महिलांना राज्यशासनाने 'शक्ती सदन'चा आधार दिला असल्याची भावना महिलांमध्ये आहे. या योजनेमुळे निराधार महिलांचे जीवन सुसह्य होण्यास मदत होत असून शासनाची ही योजना निराधारांचे जीवनमान उंचावत आहे.राज्यातील निराधार, निराश्रित, नैसर्गिक आपत्तीत, कौटुंबिक हिंसाचारामध्ये बेघर झालेल्या महिला व त्यांच्या बालकांना अन्न, वस्त्र, निवारा व वैद्यकीय मदत, कायदेविषयक समुपदेशन हेल्पलाईनद्वारे मार्गदर्शन, समुपदेशन उपलब्ध करून देण्यासाठी 'शक्ती सदन योजना' राबविण्यात येते. २८ जिल्ह्यातील ४३ संस्थामध्ये ६३०० महिलांची काळजी व संरक्षण शक्ती सदनमार्फत करण्यात येत आहे. तसेच लैंगिक शोषणाला बळी पडलेल्या, अनैतिक व्यापारात अडकलेल्या महिला व मुलींचे स्वयंसेवी संस्थांच्या माध्यमातून संगोपन, शिक्षण व व्यावसायिक प्रशिक्षण देऊन पुनर्वसन महिला व बालविकास विभागामार्फत राज्यात केंद्र पुरस्कृत शक्ती सदन या योजनेच्या माध्यमातून करण्यात येते. शिवणकाम, ड्रेस डिझायनींग, टायपींग,एम एच सीआयटी कोर्स, नर्सींग असे विविध व्यावसायिक शिक्षण दिले जाते तसेच उच्च शिक्षणासाठी मार्गदर्शन व मदत केली जाते. शक्ती सदनची मदत घेण्यासाठी वैयक्तिक महिला अथवा सामाजिक संस्थांना जिल्ह्यातील महिला व बालविकास विभागात मार्गदर्शन करण्यात येते.

महिलांची सुरक्षितता व सक्षमीकरणासाठी केंद्र शासनाकडून मिशन शक्ती हा एकात्मिक महिला सबलीकरण कार्यक्रम सुरू करण्यात आला आहे. या योजनेअंतर्गत संबल व सामर्थ्य या दोन उप योजना राबविण्यात येतात. यापैकी सामर्थ्य उपयोजनेंतर्गत महिलांच्या सक्षमीकरणावर भर देण्यात येत असून या योजनेकरिता केंद्र व राज्य शासनाकडून ६०:४० प्रमाणात निधी उपलब्ध करून देण्यात येतो.विधवा महिला, कुटुंबाने दुर्लक्षित केलेल्या सामाजिक व आर्थिक पाठबळाशिवाय राहणाऱ्या महिला, नैसर्गिक आपत्तीमध्ये बेघर झालेल्या महिला, कुटुंबाने आधार काढून घेतलेल्या निराधार, कौटुंबिक हिंसाचारात बळी पडलेल्या, अनैतिक व्यापारातून सुटका केलेल्या महिला व मुली, लैंगिक शोषणाला बळी पडलेल्या महिला व मुली, तसेच १२ वर्षापर्यंतच्या मुलींना 'शक्ती सदन' येथे राहण्याची जास्तीत जास्त तीन वर्षासाठी राहण्याची परवानगी असते. त्यापुढे त्यांच्या परिस्थितीनुसार निर्णय घेण्यात येतो. ५५ वर्षापेक्षा जास्त वय असलेल्या महिलांना पाच वर्षापर्यंत राहण्याची सोय असते त्यानंतर त्यांना वृद्धाश्रमात स्थलांतरीत केले जाते. स्वयंसेवी संस्थांच्या सहाय्याने महिलांचे सहाय्य व पुनर्वसन शक्ती सदनच्या माध्यमातून करण्यात येते. या योजनेअंतर्गत अन्न, वस्त्र व निवारा या मुलभूत सुविधा उपलब्ध करून देण्यात येतात. तसेच, पिडीत महिलेला कायदेशीर सहाय्य विधि सेवा प्राधिकरण यांच्या मार्फत दिले जाते. आपत्कालीन परिस्थितीमध्ये उपचारांसाठी वैद्यकीय सुविधा उपलब्ध करून देण्यात येते.

### शून्यातून विश्व : दूध विक्रीतून तरुणाला महिन्याला बक्कळ कमाई

आजकाल तरुणांमध्ये नोकरीत मन न लागणे किंवा नोकरी मिळण्यास अडचणी येणे सामान्य झाले आहे. नाशिकचा मोहित शेळके, ज्याने बी.एस.सी एग्री पूर्ण केल्यानंतर अनेक नोकऱ्या करूनही समाधान न मिळाल्याने नोकरी सोडून दूध विक्रीचा व्यवसाय सुरू केला आहे. तो आता एक यशस्वी तरुण उद्योजक म्हणून ओळखला जातो. मोहितच्या या निर्णयाकडे पाहिले तर तो आपल्या स्वप्नाला आणि आवडीला प्राधान्य देणारा एक उदाहरण आहे.

मोहित म्हणतो की, आजच्या तरुणांमध्ये स्वतःचा व्यवसाय करण्याची हिंमत कमी झाली आहे. अनेकजण नोकरी न मिळाल्याने हताश होऊन चुकीचे पाऊल उचलतात. मात्र आवडत्या क्षेत्रात मेहनत केल्यास नक्कीच यश मिळू शकते. नोकरी न मिळाल्यास लाज न बाळगता छोटा व्यवसाय सुरू करावा, असे त्याचे मत आहे.शिक्षण कितीही असले तरी काम करताना लाज वाटू नये. मोहित दुधाचे ग्लास धुण्यापासून ते झाडू मारण्यापर्यंत सर्व काम स्वतः करत आहे. तो नक्कीच अनेक तरुणांसाठी आदर्श ठरला आहे, ज्यांनी धैर्य आणि इच्छाशक्तीने आपला व्यवसाय सुरू करून प्रोत्साहन दिले आहे.याप्रमाणे समाजात अशी उदाहरणे वाढल्यास तरुणांमध्ये उद्योजकीय वृत्ती वाढेल आणि त्यांना नोकरीच्या निर्भरतेऐवजी स्वावलंबनाकडे वाटचाल करता येईल. मुली, मुलं, नव्या तऱ्हेचे उद्योजक तयार होऊन आर्थिक स्थैर्य आणि आनंदाने जीवन जगू शकतील. म्हणूनच मोहित सारख्या तरुणाचे या प्रवासाचे महत्त्व स्थानिक तसेच सामाजिक स्तरावर अधोरेखित केले पाहिजे. या व्यवसायातून महिन्याला 70 हजार रुपये कमाई करत आहेत.अशा प्रेरणादायी कथा तरुणांमध्ये नवी ऊर्जा निर्माण करतात आणि त्यांना सकारात्मक दृष्टिकोनातून त्यांचा भविष्य घडवण्यास प्रोत्साहित करतात. एवढेच नाही तर समाजातील प्रत्येक व्यक्तीही स्वतःची जागा ओळखून सदैव प्रगती करायला उद्युक्त होते. मोहित शेळके यांची ही यशोगाथा तरुणांसाठी एक चांगला मार्गदर्शक ठरू शकते.

### शब्दार्थ : ATKT

ATKT चा फुल फॉर्म "Allowed to Keep Terms" असा होतो. मराठीमध्ये याला "अटी ठेवण्याची परवानगी" असे म्हणतात. ATKT हा एक परवाना आहे जो विद्यार्थ्यांना अभ्यासक्रमात पुढे जाण्याची अनुमती देतो, जरी विद्यार्थी मागील वर्षात सर्व विषयांमध्ये उत्तीर्ण नसतील तरीही.भारतीय शिक्षण व्यवस्थेतील ही एक प्रक्रिया आहे जी अंडरग्रेजुएट आणि ग्रॅज्युएट विद्यार्थ्यांना 1 ते 4 विषयात अनुत्तीर्ण झाल्यास पुढील वर्गात शिकू देते. विद्यार्थ्यांना पुढील वर्गात प्रवेश घेण्यापूर्वी अनुत्तीर्ण झालेले पेपर पास करावे लागतात.

**संकलन –संयोजन: सुबोध रणशेवरे**

दैनिक
# अतुल्य महाराष्ट्र

Last page

बीड, गुरुवार 2 एप्रिल 2026

# उपविभागीय अधिकारी व नगराध्यक्षांच्या उपस्थितीत परळीत मतदार मॅपिंग कार्यशाळा उत्साहात

## सर्व नागरिकांनी मतदार नोंदणी प्रक्रियेत सक्रिय सहभाग नोंदवावा - नगराध्यक्षा सौ. पद्मश्रीताई बाजीराव धर्माधिकारी

**परळी वैजनाथ | प्रतिनिधी**

लोकशाही प्रक्रिया अधिक सक्षम व पारदर्शक करण्याच्या उद्देशाने परळी शहरातील सर्व मतदान केंद्रस्तरीय अधिकारी (बीएलओ) यांची मतदार मॅपिंग संदर्भातील महत्त्वपूर्ण कार्यशाळा उत्साहात पार पडली.ही कार्यशाळा उपविभागीय अधिकारी तथा मतदान नोंदणी अधिकारी अरविंद लाटकर यांच्या मार्गदर्शनाखाली लोकनेते गोपीनाथराव मुंडे नटराज रंग मंदिर येथे आयोजित करण्यात आली होती. यावेळी परळीच्या नगराध्यक्षा सौ.पद्मश्रीताई बाजीराव धर्माधिकारी यांची प्रमुख उपस्थिती होती.

सखोल मतदार पुनरावलोकन कार्यशाळेत मतदार नोंदणी प्रक्रिया अधिक प्रभावी, अचूक व पारदर्शक करण्यावर भर देण्यात आला. यामध्ये मतदार यादी अद्ययावत ठेवणे, नवीन मतदारांची






नोंदणी करणे, स्थलांतरित मतदारांची योग्य नोंद करणे तसेच मतदान केंद्रनिहाय मॅपिंग कसे करावे याबाबत बीएलओ अधिकाऱ्यांना सविस्तर प्रशिक्षण देण्यात आले.

लोकशाही व्यवस्थेचा कणा असलेल्या मतदान प्रक्रियेत प्रत्येक पात्र नागरिकाचा समावेश होणे आवश्यक असल्याचे यावेळी अधोरेखित करण्यात आले. अशा उपक्रमांमुळे निवडणूक प्रक्रिया अधिक विश्वासार्ह व मजबूत होण्यास मदत होणार असल्याचे मत व्यक्त करण्यात आले.या प्रसंगी नगराध्यक्षा सौ. पद्मश्रीताई बाजीराव धर्माधिकारी यांच्यासह नगरसेवक व मान्यवर उपस्थित होते. उपस्थितांनी या उपक्रमाचे स्वागत करत प्रशासनाला सहकार्य करण्याचा विश्वास व्यक्त केला. दरम्यान, मतदार जागरूकता वाढविण्यासाठी सर्व नागरिकांनी पुढाकार घेऊन मतदार नोंदणी प्रक्रियेत सक्रिय सहभाग नोंदवावा, असे आवाहन नगराध्यक्षा सौ. पद्मश्रीताई बाजीराव धर्माधिकारी यांनी केले.



# एका दिवसात हजारो नागरिकांच्या समस्या मार्गी; कासोळा येथील 'समाधान शिबिर' ठरले अत्यंत यशस्वी

## 2670 लाभार्थ्यांना थेट शासकीय योजनांचा लाभ





**महागाव** : महाराष्ट्र शासनाच्या 'छत्रपती शिवाजी महाराज महसूल समाधान शिबिर अभियान – टप्पा १' अंतर्गत महागाव तालुक्यातील कासोळा येथील जिल्हा परिषद शाळेत आयोजित करण्यात आलेले समाधान शिबिर उत्स्फूर्त प्रतिसादात यशस्वीरीत्या पार पडले. नागरिकांच्या समस्या तत्काळ सोडविण्याच्या उद्देशाने घेण्यात आलेल्या या शिबिरात सुमारे ३ हजार नागरिकांनी सहभाग नोंदवला, तर त्यापैकी २६७० नागरिकांना विविध शासकीय योजनांचा थेट लाभ देण्यात आला.

शिबिराच्या अध्यक्षस्थानी तहसीलदार अभय मस्के होते. यावेळी मंत्री इंद्रनील नाईक यांच्या पत्नी तथा नगराध्यक्ष मोहिनीताई नाईक, शेतकरी नेते मनीष जाधव, गटविकास अधिकारी दत्तराव कदम, नायब तहसीलदार गजानन पराते, मंडळ अधिकारी संजय वैद्य, संदीप मानकर, गोविंद ठाकरे,दीपक चव्हाण यांच्यासह विविध विभागांचे अधिकारी व कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

शिबिरादरम्यान महसूल विभागाशी संबंधित प्रलंबित फेरफार प्रकरणे, ७/१२ व ८-अ उताऱ्यांतील त्रुटी दुरुस्ती, अभिलेख दुरुस्ती आदी कामांसह उत्पन्न, रहिवासी, जात व क्रीमीलेअर प्रमाणपत्रे तसेच विविध सामाजिक योजनांचा लाभ नागरिकांना देण्यात आला. 'वन डे सर्व्हिस' संकल्पनेमुळे अनेक नागरिकांची कामे त्याच दिवशी पूर्ण झाल्याने शिबिरात समाधानाचे वातावरण निर्माण झाले.

अध्यक्षीय भाषणात तहसीलदार अभय मस्के यांनी शिबिराला मिळालेल्या प्रतिसादाबद्दल समाधान व्यक्त केले. शासनाच्या योजना थेट नागरिकांपर्यंत पोहोचवून त्यांच्या समस्या जलदगतीने सोडविणे हा या उपक्रमाचा मुख्य उद्देश असल्याचे त्यांनी स्पष्ट केले. प्रशासनाच्या समन्वयातून मोठ्या प्रमाणावर नागरिकांची कामे मार्गी लागल्याने उपस्थितांनी समाधान व्यक्त करत प्रशासनाचे आभार मानले.

या शिबिरामुळे शासनाच्या सेवा अधिक वेगाने व पारदर्शक पद्धतीने नागरिकांपर्यंत पोहोचविण्याच्या दिशेने महत्त्वपूर्ण पाऊल उचलले गेल्याची भावना सर्वत्र व्यक्त होत आहे.

# महावीर जयंतीनिमित्त अरिहंत जैन सेवाभावी संस्था, दिगंबर जैन मंदिर व आनंदऋषी नेत्रालय यांच्या संयुक्त विद्यमाने मोफत नेत्र तपासणी शिबिर संपन्न

**परळी वैजनाथ | प्रतिनिधी**

महावीर जन्म कल्याणक निमित्त अरिहंत जैन सेवाभावी संस्था, दिगंबर जैन मंदिर व आनंदऋषी नेत्रालय अहिल्यनगर यांच्या संयुक्त विद्यमाने मोफत नेत्र तपासणी शिबिराला मोठा प्रतिसाद मिळाला. मोफत नेत्र तपासणी शिबिरात 220 रूग्णांची नेत्र तपासणी करण्यात आली.

परळीतील गणेशपार भागातील जैन मंदिर सभागृहात सोमवार दि.30 मार्च 2026 रोजी सकाळी 11 वाजता या शिबिराचे आयोजन करण्यात आले होते. या शिबिराचे उद्घाटन परळी नगर परिषदेच्या नगराध्यक्षा सौ.पद्मश्री बाजीराव धर्माधिकारी यांच्या हस्ते करण्यात आले. याप्रसंगी प्रतिष्ठीत व्यापारी शांतीलालजी जैन, विजयजी वाकेकर, धरमचंदजी बडेरा, ओमप्रकाशजी मुळुजकर, प्रकाशचंद कांकरिया, सौ.लता तातेड, सौ. मधुबाला कांकरिया आदींची प्रमुख उपस्थिती लाभली. या शिबिरात नेत्रतज्ञ गणेश तवळे यांनी रूग्णांची तपासणी केली.





त्यांना कुंदन शिंदे, अरूण वाघमारे, गणेश घोलप आदींनी सहकार्य केले. शिबिराचे वैशिष्ट्ये म्हणजे 6 महिन्याच्या बाळाची देखील नेत्र तपासणी करण्यात आली. या शिबिराला सकल जैन समाज बांधवांचा मोठा प्रतिसाद मिळाला.

शिबिर यशस्वी करण्यासाठी अरिहंत जैन सेवाभावी संस्थेचे अध्यक्ष प्रितम बोरा, सचिव धिरज बडेरा यांच्याह त्यांचे सर्व पदाधिकारी तसेच महावीर संघई, महावीर महालिंग, मयूर मुळजकर, नेमिचंद कुरकूट, रमेश संघई, धीरज दुरुगकर, अमोल संघई, वैभव कुरकुट, कुलभूषण कटके आदींनी परिश्रम घेतले. कार्यक्रमाचे सुत्रसंचालन व आभार प्रदर्शन मयूर मुळजकर यांनी केले.

# आष्टी तालुक्यात चक्री जुगारावर पोलिसांचा छापा; तिघे ताब्यात, ३२ हजारांचा मुद्देमाल जप्त

**आष्टी** : तालुक्यातील मराठवाडी (ता. आष्टी) येथे सुरू असलेल्या अवैध चक्री जुगार अड्ड्यावर आंभोरा पोलिसांनी बुधवारी (दि. १ एप्रिल) दुपारी सुमारे ३ वाजता छापा टाकून कारवाई केली. या कारवाईत तिघांना ताब्यात घेण्यात आले असून एकूण ३२,६९५ रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे.

पोलिसांकडून मिळालेल्या माहितीनुसार, आरोपींकडून १२,००० रुपये रोख रक्कम तसेच एलसीडी, सीपीयू, माऊस, कीबोर्ड, चक्री चार्ट व इतर जुगार साहित्य असा २०,६९५ रुपयांचा मुद्देमाल हस्तगत करण्यात आला. यासह एकूण ३२,६९५ रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे.

सदर आरोपी 'चक्री' नावाच्या जुगाराद्वारे ० ते ९ या आकड्यांवर पैसे लावून स्वतःच्या फायद्यासाठी जुगार खेळत व खेळवित असल्याचे तपासात निष्पन्न झाले आहे. या प्रकरणी आरोपींविरुद्ध महाराष्ट्र जुगार प्रतिबंधक कायदा कलम १२ (अ) अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे. आंभोरा पोलीस स्टेशनकडून हद्दीतील अवैध धंद्यांवर यापुढेही कठोर कारवाया सुरू राहणार असल्याचे पोलिसांनी स्पष्ट केले आहे.



# अंबाजोगाई पिपल्स को-ऑप बँकेकडून मार्च २०२६ अखेर १ हजार ३२ कोटींचा एकूण बँकिंग व्यवसाय ; शुन्य टक्के नेट एनपीए राखण्यात बँकेस यश

## 665 कोटींच्या ठेवी जमवत 5 कोटी 26 लक्ष रुपयांचा निव्वळ नफा - चेअरमन राजकिशोर मोदी यांची माहिती

**अंबाजोगाई (प्रतिनिधी)**

अंबाजोगाई पिपल्स को-ऑप बँकेने सन २०२५-२०२६ मधील केलेल्या उत्तम कामकाजामुळे ३१ मार्च २०२६ अखेर बँकेने ६६५ कोटींच्या ठेवी जमवत वर्षाखेरीस शुन्य नेट एनपीए राखण्यात यश मिळवले आहे. त्याबरोबर बँकेस ५ कोटी २६ लक्ष रूपयांचा निव्वळ नफा मिळाला असल्याची माहिती बँकेचे संस्थापक अध्यक्ष राजकिशोर मोदी, उपाध्यक्ष प्रकाश सोळंकी तसेच मुख्य कार्यकारी अधिकारी धनंजय देशपांडे यांनी प्रसिद्धीस दिलेल्या पत्रकाद्वारे दिली आहे.

बँकेने मिळविलेले आजचे हे यश दिवंगत लोकनेते माजी मुख्यमंत्री विलासरावजी देशमुख, दिवंगत लोकनेते माजी उपमुख्यमंत्री अजितदादा पवार, दिवंगत लोकनेते माजी आमदार बाबुरावजी आडसकर तसेच माजी कृषिमंत्री आ.धनंजयजी मुंडे साहेब, माजी आमदार अमरसिंहजी पंडित साहेब यांचे सातत्यपूर्ण मार्गदर्शन, मोलाची मदत व सहकार्य लाभले आहे. या सोबतच बँकेचे सर्व सन्माननीय संचालक, ठेवीदार, कर्जदार, भागधारक, ग्राहक, हितचिंतक तसेच सभासदांच्या सातत्यपूर्ण विश्वास व सहकार्याच्या भावनेमुळेच शक्य झाले असल्याचे देखील या पत्रकात नमूद केले आहे. मार्च २०२६ अखेर बँकेची एकूण सभासद संख्या १३,१५८ एवढी असून त्याच्या बळावरच बँकेच्या सभासद तथा ग्राहक बांधवांना मार्च २०२६ अखेर रू.३६९ कोटी इतके कर्जवाटप केले आहे. या आर्थिक वर्षाचे रू.२१ कोटी एवढे भाग भांडवल असून बँकेचा स्वनिधी रू.५४ कोटी एवढा आहे. त्याच बरोबर वर्ष अखेरीस बँकेने एकूण रू.३५० कोटी एवढी गुंतवणूक केली आहे. ३१ मार्च २०२६ अखेर बँकेने एकूण ठेवी रू.६६५ कोटी इतक्या जमा केलेल्या आहेत. सर्व ठेवींना विमा संरक्षण आहे. गतवर्षीच्या तुलनेत तब्बल १३० कोटी रूपयांची व्यवसायात वाढ झाली आहे. स्थापनेपासून बँकेने लेखा परिक्षण वर्ग-अ कायम राखला आहे. तर अंबाजोगाई पिपल्स को-ऑप बँकेने मार्च २०२६ अखेर तब्बल १ हजार ३२ कोटींचा एकूण बँकिंग व्यवसाय केला असून शुन्य टक्के नेट एनपीए राखण्यात बँकेस यश आले आहे. तर बँकेने ३१ मार्च २०२६ अखेर ५



राजकिशोर मोदी
(संस्थापक अध्यक्ष, अंबाजोगाई पिपल्स को-ऑप बँक मर्या. अंबाजोगाई)

कोटी २६ लक्ष रूपयांचा निव्वळ नफा मिळवला आहे. सर्व क्षेत्रातील आर्थिक परिस्थिती पाहता उत्तम टीमवर्क व सांघिक कामगिरीमुळे बँकेस हे प्रगतीचे उद्दीष्ट साध्य करता आले असल्याचे बँकेचे संस्थापक राजकिशोर मोदी, उपाध्यक्ष प्रकाश सोळंकी व मुख्य कार्यकारी अधिकारी धनंजय देशपांडे यांनी प्रसिद्धीपत्रात नमूद केले आहे. मार्च २०२६ अखेरील बँकेची प्रगती ही बँकेच्या पुढील वाटचालीस नवीन उभारी देणारी असून बँकेच्या सभासदांनी व ग्राहकांनी बँकेवरील विश्वास कायम ठेवल्याची पावती असल्याचे देखील मोदी यांनी नमूद केले आहे. चालू आर्थिक वर्षात अनंत अडचणी येऊनही बँकेच्या वसुली विभागाने समाधानकारक काम करीत बँकेचा निव्वळ एनपीए शुन्य टक्के राखण्यात यश मिळवले आहे. देशातील सद्य आर्थिक परिस्थितीत देखील कर्जधारक, ग्राहकांचा विचार करून बँकेने सुरळीत व पारदर्शक आर्थिक व्यवहार करीत बँकेची आर्थिक स्थिती समाधानकारक ठेवण्यास यश मिळवले आहे असे मत बँकेचे संस्थापक अध्यक्ष मोदी यांनी व्यक्त केले. बँकेचे सर्व सभासद, ग्राहक यांचा विश्वास, बँकेचे संचालक मंडळ तसेच बँकेचे मुख्य कार्यकारी अधिकारी यांचे उत्कृष्ट नियोजन व बँकेच्या अधिकारी व कर्मचारीवृंदांचे नियोजनबध्द कामकाज यामुळे सन २०२५-२०२६ मध्ये चांगले कामकाज करणे शक्य झाले आहे. अशीच कामगिरी पुढील आर्थिक वर्षातही कायम ठेवण्याचा बँकेचा प्रयत्न असेल अशी ग्वाही बँकेचे अध्यक्ष मोदी यांनी दिली आहे. १९९६ साली केवळ एका शाखेद्वारे अतिशय अल्प अशा भांडवलावर सुरू झालेली अंबाजोगाई पिपल्स को-ऑप बँक आज ६६५ कोटी ठेवींच्या माध्यमातून महाराष्ट्र राज्याच्या बीड, लातूर, धाराशिव, छत्रपती संभाजीनगर, पुणे, अहिल्यानगर या जिल्ह्यांत २१ कार्यरत शाखा व २ विस्तारित कक्ष अशा एकूण २३ शाखांच्या माध्यमातून ग्राहकांना तत्पर व दर्जेदार बँकिंग सेवा देत आहे. भारतीय रिझर्व्ह बँकेने परवानगी दिलेल्या केज, मुरूड व निलंगा या ठिकाणी बँकेच्या नवीन तीन शाखा अहवाल वर्षात कार्यरत झाल्या आहेत. रिझर्व्ह बँकेच्या सर्व नियमांच्या आधीन राहूनच अंबाजोगाई पिपल्स बँक आजपर्यंत सर्व आर्थिक व्यवहार करीत आहे. म्हणूनच रिझर्व्ह बँकेने नवीन शाखा सुरू करण्यास परवानगी दिल्याचे मोदी यांनी या पत्रकात नमूद केले आहे. अंबाजोगाई पिपल्स बँक अर्थकारण करीत अनेक समाजोपयोगी उपक्रम राबवित आहे. ज्यामध्ये शहरातील गुणिजनांचा सन्मान, रक्तदान शिबिर, वृक्षारोपण याबरोबरच महिलांसाठी बँकिंग प्रशिक्षण शिबिर, विविध सांस्कृतिक व सामाजिक उपक्रम राबविण्यात बँक अग्रस्थानी असते. या व अशा इतर अनेक कारणांमुळे अंबाजोगाई पिपल्स बँक ग्राहकांच्या प्रथम पसंतीस उतरली असल्याचे समाधान बँकेचे अध्यक्ष मोदी यांनी व्यक्त केले आहे. यापुढेही बँकेचे उपाध्यक्ष प्रकाश सोळंकी, सन्माननीय संचालक प्रा.वसंतराव चव्हाण, ॲड.विष्णुपंत सोळंके, पुरूषोत्तम चोकडा, सुरेश मोदी, ॲड.सुधाकर कराड, संकेत मोदी, शेख दगदुभाई शेख दावल, सुधाकर विडेकर, प्रकाश लखेरा, हर्षवर्धन वडमारे, श्रीमती वनमाला रेड्डी, सौ.स्नेहा हिवरेकर, सुनिल राजपुरोहित, सचिन बेंबडे आणि मुख्य कार्यकारी अधिकारी धनंजय देशपांडे, सर्व अधिकारी, शाखाधिकारी, कर्मचारीवृंद, पिग्मी एजंट यांच्या सहकार्याने अर्थकारणा सोबतच वारंवार असेच सामाजिक, शैक्षणिक व सांस्कृतिक उपक्रम राबविण्यात येतील असा संकल्प बँकेचे संस्थापक अध्यक्ष राजकिशोर मोदी यांनी व्यक्त केला आहे.